शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे

डॉ. शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडा.

मराठी विभाग आणि राज्यशास्त्र विभाग दिनांक २९/०८/२०२३.

ऑनलाईन चर्चासत्र अहवाल

शिक्षक संचालित शिक्षण संस्थेच्या डॉ. शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय वाडा च्या मराठी विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २३-२४ मध्ये दि. २८/०८/२०२३ रोजी " एकोणिसाव्या शतकातील वाङ्मयीन संस्कृती आणि राजकीय जाणिवा: परस्परसंबंधांचा विचार" या विषयावर प्रा. डॉ. नीतीन रिंढे- प्राध्यापक, विभागप्रमुख, मराठी विभाग, चेतना महाविद्यालय वांद्रे यांचे व्याख्यान झूम प्रणालीद्वारे आभासी पध्दतीने सकाळी १०.३० वाजता संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि साधन व्यक्तींची ओळख हे काम प्रा. डॉ. कैलास जोशी, मराठी विभागप्रमुख यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. किरणकुमार कवठेकर यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीत आणि देवी सरस्वती यांच्या वंदनाने झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. प्रा. डॉ. किशोरी भगत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात त्यांनी कला आणि साहित्य यांचे महत्त्व प्रतिपादित केले. डॉ. नीतीन रिंढे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात एकोणिसाव्या शतकातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक घडामोडी यावर प्रकाश टाकला. आपल्या व्याख्यानात डॉ. रिंढे यांनी एकोणिसाव्या शतकाचे महाराष्ट्रीय सांस्कृतिक विश्वात आणि राजकीय परिप्रेक्षात असलेले महत्त्व प्रतिपादित केले आणि या दुर्लक्षित काळाचा अधिक अभ्यास होण्याची गरज प्रतिपादित केली. कार्यक्रमाचे आभार प्रा. संतोष भावार्थे, राज्यशास्त्र विभागप्रमुख यांनी व्यक्त केले. आय टी समन्वयक म्हणून श्री. अजिंक्य झांबरे यांनी काम पहिले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तसेच इतर विद्यापीठातील कार्यक्षेत्रातील महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

प्रा. संतोष भावार्थे
राज्यशास्त्र विभागप्रमुख

डॉ. कैलास प्रभाकर जोशी.
मराठी विभागप्रमुख

कार्यक्रमाची निवडक छायाचित्रे पुढे.








